RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ८३] गुरुवार, ऑक्टोबर २९, २०१५/कार्तिक ७, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८२**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर २०१५.

**आदेश**

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५.**

क्रमांक इसीए. १००९/प्र. क्र. ५५१/ नापु-२३ .— अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याचे कलमे ३ व डाळी, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेल आदेश (साठा निर्बंध), १९७७ च्या कलम ७अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि भारत सरकारच्या ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय (ग्राहक बाबी विभाग) यांचे पत्र क्रमांक ११/५/२००६-इसीआर आणि ई, दिनांक १२ फेब्रुवारी २०१० अन्वये आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि केंद्र शासनाच्या पूर्वसहमतीने डाळी, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेल (साठा निर्बंध) आदेश, १९७७ मध्ये सुधारणा करण्याकरिता याद्वारे महाराष्ट्र शासन खालीलप्रमाणे आदेश करीत आहेत :—

१. या आदेशास "महाराष्ट्र डाळी, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेल (साठा निर्बंध) (चतुर्थ सुधारणा) आदेश, २०१५" असे म्हणावे .

२. डाळी, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेल (साठा निर्बंध) आदेश, १९७७ च्या खंड ४ मधील परिशिष्ट मध्ये (ii) **खाद्य तेलबिया (टरफल असलेल्या शेंगदाण्यासह) साठी—**

(१) महानगरपालिका क्षेत्रातील घाऊकसाठी असलेली साठा मर्यादा **२,००० क्विंटल साठा मर्यादे ऐवजी २०,००० क्विंटल** साठा मर्यादा असे वाचावे.

(२) महानगरपालिका क्षेत्रातील किरकोळसाठी असलेली साठा मर्यादा **२०० क्विंटल साठा मर्यादे ऐवजी २,००० क्विंटल** साठा मर्यादा असे वाचावे.

(३) इतर ठिकाणी घाऊकसाठी असलेली साठा मर्यादा **८०० क्विंटल साठा मर्यादे ऐवजी ८,००० क्विंटल** साठा मर्यादा असे वाचावे.

(४) इतर ठिकाणी किरकोळसाठी असलेली साठा मर्यादा **१०० क्विंटल साठा मर्यादे ऐवजी २,००० क्विंटल** साठा मर्यादा असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स. श्री. सुपे,**
शासनाचे उप सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated 28th October 2015.

### Order

ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955.

No. ECA.1009/CR-551/CS-23 .— In exercise of the powers conferred by section 3 of the Essential Commodities Act, 1955 (10 of 1955) read with clause 7A of the Pulses, Edible Oilseeds and Edible Oils (Storage Control) Order, 1977 and Government of India, Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution, Department of Consumer Affairs, letter No. 11/5/2006-ECR and E, dated the 12th February 2010 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, with the prior concurrence of the Central Government, makes the following Order, further to amend the Pulses, Edible Oilseeds and Edible Oils (Storage Control) (Amendment) Order, 1977, namely :—

1. This Order may be called the Maharashtra Pulses, Edible Oilseeds and Edible Oils (Storage Control) (Amendment) Order, 2015.

2. In sub-clause (1) of clause 4 in the Schedule for (ii) **Edible Oilseeds including groundnut in shell —**

(*i*) stock limit for Wholesalers in Corporation Areas **20,000 quintals instead of 2,000 quintal** is included.

(*ii*) stock limit for retailers in Corporation Areas **2,000 quintals instead of 200 quintal** is included.

(*iii*) stock limit for Wholesalers in Other Areas **8,000 quintals instead of 800 quintal** is included.

(*iv*) stock limit for retailers in Other Areas **2,000 quintals instead of 100 quintal** is included.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. SUPE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.